आपली सेवा आमचे कर्तव्य

महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग
७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.

ई-मेल-: ccrts@maharashtra.gov.in
दुरध्वनी क्र. ०२२ -२२८३२३४६

क्र. विआस्था-२०१९/प्र.क्र.३१/मुसेहआ

दिनांक :- ०७ डिसेंबर, २०१९

वाचा :- १. सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र. आरटीएस-२०१६/प्र.क्र. १२४(१)/१८ (र. व का.), दि. ३०.०७.२०१६.
२. सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र. आरटीएस-२०१६/प्र.क्र.१२४/१८ (र. व का.), दि. १३.०९.२०१९.
३. या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र. अपिल-२०१७/प्र. क्र. १५/मुसेहआ, दि. २७.०६.२०१७.

## कार्यालयीन आदेश

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील दि. ३०.०७.२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये मुंबई येथे "महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग" व प्रत्येक महसूली विभागासाठी ०१ अशी एकूण ०६ राज्य लोकसेवा हक्क आयुक्त कार्यालये गठीत करण्यात आली आहेत, ज्यामध्ये ०१ राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त, ज्यांची अधिकारिता मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा या पुरती आहे आणि राज्य लोकसेवा हक्क आयुक्त ज्यांची अधिकारिता संबंधित महसुली विभागापुरती आहे. तथापि, प्रत्येक महसुल विभागाकरीता (एकूण ०६) राज्य लोकसेवा हक्क आयुक्त यांची नियुक्ती केलेली नसल्याने, अपिलांच्या कालमर्यादेचे उल्लंघन होऊ नये, म्हणून तसेच जनतेस वेळीच न्याय मिळून त्वरित सेवा प्राप्त व्हाव्यात याकरीता, इतर ०६ आयुक्तांची नियुक्ती होईपर्यंत मा. मुख्य आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग हे मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा तसेच इतर जिल्ह्यातील प्राप्त अपिलांवर सुनावणी घेतील, अशा सूचना संदर्भ क्र. ३ येथील आदेशांन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. तथापि, दि. १३.०९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये, श्रीमती मेधा गाडगीळ यांची राज्य लोकसेवा हक्क आयुक्त, कोंकण महसुली विभाग या पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच त्यांनी दि.१३.०९.२०१९ रोजी पदभार स्विकारला आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम १३ (२) (ख) नुसार कोंकण महसुली विभागासाठी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून) प्राप्त होणाऱ्या अपिलांचे व अर्ज/ तक्रारी/ निवेदनांबाबतचे कामकाज राज्य लोकसेवा हक्क आयुक्त, कोंकण महसुली विभाग यांच्याकडे सोपविण्यात येत आहे.

३. कोंकण महसुली विभाग कार्यालयाच्या जागेबाबतचा शासन आदेश निर्गमित होईपर्यंत मुख्य लोकसेवा हक्क आयोगाकडे ऑनलाईन / ऑफलाईन स्वरुपात कोंकण विभागासाठी प्राप्त होणारी अपिले

राज्य लोकसेवा हक्क आयुक्त, कोंकण महसुली विभाग यांच्याकडे वर्ग करण्यात येतील. राज्य लोकसेवा हक्क आयुक्त, कोंकण महसुली विभाग यांनी कार्यालय स्थापन होईपर्यंत, व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून अपिलांची सुनावणी घ्यावी.

(आण्णासाहेब चव्हाण)
उपसचिव
राज्य लोकसेवा हक्क आयोग

प्रत:-

१. श्रीमती मेधा गाडगीळ, आयुक्त, लोकसेवा हक्क आयोग, कोकण विभाग.
२. सचिव (प्र.सु.र व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. विभागीय आयुक्त,कोंकण विभाग , सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
४. सर्व जिल्हाधिकारी, कोंकण विभाग (विभागीय आयुक्त कोंकण कार्यालयामार्फत).
५. उपसचिव, राज्य लोकसेवा हक्क आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई -३२.
६. सर्व कक्ष अधिकारी, राज्य लोकसेवा हक्क आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई –३२.
७. वैयक्तिक नस्ती/ निवड नस्ती, आस्थापना.